# अंतरलहरी

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

मे - ऑगस्ट २०१३ वर्ष ६ अंक २ पृष्ठे ८ रु. २/-




## आपण संपूर्णतः प्रामाणिकपणे कसे जगू शकतो?

**आ**पण संपूर्णत: प्रामाणिकपणे कसे जगू शकतो? प्रामाणिकपणा म्हणजे काय? प्रामाणिकपणा म्हणजे एखादी पूर्वसंकल्पना नव्हे. कुठच्यातरी विचार प्रणालीची संकल्पना नव्हे किंवा एखादे लहरी, काल्पनिक, अद्‌भूत, भावनिक दर्शन नव्हे. किंबहुना तेथे कोणताही भ्रम असता कामा नये. प्रामाणिकपणामध्ये कसलाही भ्रम असत नाही. भ्रम (illusion) हा शब्द – याचा अर्थ आम्ही शब्दकोषामध्ये काळजीपूर्वक पाहिला आहे – हा मूळ शब्द ludre या शब्दापासून आला आहे– याचा अर्थ to play, खेळणे. आपण भ्रमाबरोबर खेळत असतो, ज्याचा आपल्या दैनंदिन जीवनाशी काहीही संबंध नसतो. कदाचित आपण अधिकाधिक काल्पनिक अद्‌भुत जीवन जगत असतो आणि म्हणून संभवत: या आधुनिक जगाला, जे बरेचसे भ्रष्ट आहे, त्याला सामोरे जाऊ शकत नाही. आणि आपण जर त्याला अनैतिक म्हणू शकलो तर – जेथे पैसा आणि सत्ता हेच महत्त्वाची भूमिका बजावतात, अशा जगात आपण दररोज संपूर्ण प्रामाणिक जीवन कसे जगू शकू?

मला कुतुहल वाटते की, आपल्यापैकी प्रत्येक जणाने स्वत:ला हा प्रश्न विचारला आहे का की पूर्णपणे प्रामाणिक सत्य जीवन जगायचे म्हणजे काय? त्यामध्ये थोडे आत शिरायचे– पण त्याआधी तेथे अनेक प्रश्न उभे राहतात. एकात्मता, अखंडता म्हणजे काय? एकात्मता ही प्रामाणिकपणाशी निगडीत आहे. एकात्मता ही मेंदूचा गुण आहे किंवा आपल्या अस्तित्वाचा गुण आहे. म्हणजे समग्रता, संपूर्णता असलेले, खंडित झालेले नव्हे. आपले जीवन तुकड्या–तुकड्यांमध्ये विभागलेले आहे. समग्रता ही कोणीतरी कल्पनेमध्ये सत्य मानलेली गोष्ट नव्हे. कल्पना केलेली, विचारातून सत्य म्हणून मानलेली आणि त्याप्रमाणे जगणे असे आपले जीवन झाले आहे. तो एक जगण्याचा मार्ग, पद्धत झाली आहे, जी विभाजित आहे. कारण विचाराने ही कल्पित गोष्ट बनवली आहे – एक संकल्पना, एक आदर्श ज्याप्रमाणे आपण जगत असतो, जे जीवन नंतर तुकड्या तुकड्यामध्ये विभागले जाते. आपण एक सत्य, तार्किक आणि शहाणपणाचे म्हणून काहीतरी कल्पना करतो आणि त्याप्रमाणे जगण्याचा प्रयत्न करतो. बरोबर? ते स्वभावत:च विभक्तपणा निर्माण करते, तोडते. तुम्ही सत्य म्हणून काहीतरी गृहित धरले आहे, प्रतिमा केली आहे, अनुभवलेले आहे आणि आपण त्याप्रमाणे जगण्याचा प्रयत्न करीत असतो, ज्याचा प्रत्यक्ष वस्तुस्थितीशी काही संबंध नसतो म्हणून आपल्या जीवनामध्ये नेहमीच विभाजन असते. हे विभाजन आपल्या जीवनात सतत चालू असते. आणि ते अंशत: अप्रामाणिकपणा आणते. आदर्शवादी हा खरे तर चांगलाच अप्रामाणिक मनुष्य असतो. मी हे जे म्हणतो आहे त्याबद्दल मला क्षमा करा. कारण तो पूर्वीच काही कल्पना करून त्याप्रमाणे जीवन जगत असतो. 'मला त्या साच्याप्रमाणे जीवन जगले पाहिजे'– ज्याचा दैनंदिन जीवनाशी काही संबंध नसतो. आणि म्हणून तेथे संघर्ष असतो. त्यामुळे दांभिकपणा येतो. तेव्हा, या जगामध्ये संपूर्ण प्रामाणिकपणे, समग्रपणे जगता येणे शक्य आहे का? अंतर्यामी योग्य गोष्ट करीत असल्याची भावना, बाह्यत: नव्हे. परंतु प्रथमत: आतून, आपले वागणे पाहायचे, आपली वर्तणूक, आपली विचार करण्याची पद्धत, भ्रमापासून मुक्त आहे का? कुठच्याही, काहीतरी कपोलकल्पित संकल्पनेवर अवलंबून नव्हे किंवा कुठच्याही व्यक्तीवर अवलंबून नाही वगैरे वगैरे. त्याला प्रचंड समग्रता लागते, प्रामाणिकपणा लागतो. तेव्हा जे तुम्हाला स्वत:ला सत्य वाटत नसते असे आपण कधीच काही म्हणत नाही. तुम्हाला जे सत्य वाटत असते ते सुद्धा अगदी कठीण असते. कारण 'हे माझे मत आहे आणि ते सत्य आहे, ' असे एखादा म्हणेल आणि जर एखादा आपल्या मताप्रमाणे जगत राहिला आणि म्हणून तो ज्या इतर लोकांना त्यांची देखील स्वतंत्र बळकट मते असतात, अशा लोकांबरोबर संघर्षात आला तर तेव्हा तेथे झगडा सुरू होतो. बरोबर? ही नेहमीची वस्तुस्थिती आहे आणि हे शक्य आहे का की आपण वस्तू जसा आहेत तशा तंतोतंत पाहू शकतो, अशी आपल्याजवळ स्पष्टता असेल – एखाद्याच्या इच्छा किंवा अपेक्षेप्रमाणे नव्हे, जसे नेहमी आपल्याकडे घडत असते. परंतु असा अगदी स्पष्ट, तर्कशुद्ध, तरतरीत मेंदू जो वैयक्तिक इच्छा, हेतू आणि परावलंबनाने कलुषित झालेला नसेल?

तेव्हा समग्रता, प्रामाणिकपणा आणि अखंडतेची भावना हा मेंदूचा गुण आहे, ज्यामध्ये दुसरी कुठचीही हालचाल नसते, ज्यामध्ये फक्त मेंदूची स्वत:ची लय चालू असते. हे सगळे बहुतेक ग्रीक – अगम्य वाटत असावे. हे फार गंभीर आहे. कारण आपण सतत कृती करीत असतो. वर्तुळासारखे गोल गोल फिरत असतो आणि आपण कधीच या वर्तुळाचा भेद करीत नाही आणि ह्या सततच्या गोल गोल फिरण्याने मेंदू फक्त मंदच होत नाही तर मेंदू यांत्रिक जीवनाकडे तुम्हाला नेत असतो आणि यांत्रिक जीवन हे प्रामाणिक नसते. ते पुनरूक्तिमय होत असते, पुन:पुन्हा तेच तेच कंटाळवाणे जीवन जगणे असते. म्हणून खोल, शाश्वत, अचल असा प्रामाणिकपणा, जो समग्र आणि अखंड असतो, संपूर्ण असतो तो शोधणे म्हणजे मेंदूची अशी अवस्था गवसणे जेथे कोणतीही हालचाल नसते. हा अर्थातच ध्यानाचा एक भाग आहे ज्या विषयी आपण अगोदरच बोललो आहोत.

सानेन १९८४, प्रश्नोत्तर सभा ३

## संपादकीय

**प्रा**माणिकपणा म्हणजे काय? अशा गोष्टी व्याख्येत गोठवता येत नाहीत तरी स्वत:शी व दुसऱ्यांशी संवाद साधण्यासाठी आणि त्यातून शक्य असेल तेवढी स्पष्टता मिळण्यासाठी विचार मांडण्याची एक सर्वसाधारण जरूरी असते. आजच्या भ्रष्ट समाजात तर त्याची खूपच जरूरी आहे.

प्रामाणिकपणा ही एक मनाची स्थिर, अदुषित अशी अवस्था म्हणता येईल. आपल्यापैकी बऱ्याच जणांसाठी ही अवस्था म्हणजे एक कल्पना, स्वप्न असेल पण तरीही मन तेथे झेपावते. विशेषत: ज्यांना शुद्ध मनाची ओढ आहे, जे समाजाची दुरावस्था पाहून व्यथित होतात, ते प्रामाणिकपणाच्या शोधात असतात.

आपण जेव्हा जाणीवपूर्वक प्रामाणिक व्हायचा प्रयत्न करतो तेव्हा त्याला ढोंगीपणाचा दर्प असतो. आपण विचारपूर्वक प्रामाणिक होऊ शकत नाही, कारण विचारच त्याला दूषित करू शकतो. ठरवून प्रामाणिक बनता येत नाही आणि अप्रामाणिकपणा तर दिसत असतो. तेव्हा प्रामाणिकपणा कसा येईल असा प्रश्न साहजिकच पडतो. जीवनाकडे वेगळ्या दृष्टीने बघणाऱ्यांना त्याची तळमळही असते.

जेव्हा सर्वत्र अप्रामाणिकपणा दिसतो तेव्हा तोच आपल्यामध्येही आहे, आपण त्यातलेच आहोत हे ओळखणे खूप महत्त्वाचे आहे. ज्या प्रकारच्या मानवी समाजात आपण वाढलोय, त्यात कळत नकळत अप्रामाणिक होण्याची सवय अंगात भिनलेली दिसेल. ते बघण्याचे धैर्य हवे.

ते बघणे कठीण असण्यापेक्षा, आपले आतील मन, ते स्वीकारण्याची तयारी नसल्यामुळे ते सत्य आपल्यापासून झाकून ठेवते आणि असत्य प्रक्षेपित करत असते. खरे तर आपल्या आतील स्वार्थ आपल्या नकळत आपल्याकडून खोटे वदवून घेत असतो, करवून घेत असतो. एक प्रकारे आपण स्वार्थाच्या हातातील बाहुले बनतो. ही स्थिती कळली तर मन हताश होते. परंतु आपल्याला तेथे पोहोचता आले नाही तरीही सत्य काही असत्य ठरत नाही. सत्य हे सत्यच असते. आपण फक्त आपल्या मर्यादा, त्यांचे वास्तव बघू शकतो. क्षणोक्षणी जागृत राहण्याचा प्रयत्न केला तर त्या मर्यादा हेच आपल्यासाठी वास्तव आहे, हे लक्षात येईल.

कदाचित ह्या मर्यादा प्रांजळपणे स्वीकारल्या तर तीच एक योग्य दिशा ठरू शकेल. कृष्णमूर्ती, 'वास्तव आहे तसे पाहा', असे म्हणतात, त्याचा मथितार्थ कदाचित हाच असेल.

# कशाशी प्रामाणिक राहणे?

**तु**म्हाला माहीत आहे, जीवनातील सर्वात कठीण गोष्ट म्हणजे प्रामाणिक राहणे हे आहे. कशाशी प्रामाणिक राहणे? तुम्हाला माझा प्रश्न समजतोय का? मला प्रामाणिक राहायचे आहे – प्रामाणिक हा एक शब्द आहे, मनाची प्रत्यक्ष प्रामाणिक अवस्था नव्हे; त्या शब्दाचा अर्थ, मुळातील अर्थ आहे स्पष्टपणे विचार करणे, अचूक विचार करणे, जे तुम्हाला माहीत आहे अगदी तेच बोलणे – सांगायची गोष्ट एक, विचार दुसराच करायचा आणि अजून तिसरीच गोष्ट करायची असे नव्हे. बहुतेक आदर्शवादी तेच करीत असतात. ते विचार एक करतात आणि करतात दुसरीच गोष्ट. मला हा सगळा अप्रामाणिकपणा वाटतो. प्रामाणिकपणा त्याचवेळी असतो ज्यावेळी तुम्हाला जे वाटते तेच बरोबर तुम्ही म्हणता, दुहेरी अर्थाशिवाय, दुटप्पी विचार न करता आणि कुठच्याही एका साच्याशी, पद्धतीशी, एका तत्त्वाशी, एका आदर्शाशी बांधिल न राहता जगता. मग तुम्ही स्वत:शी प्रामाणिक असता, जो विचार तुम्ही करता तेच तुम्ही करता. जे तुम्हाला वाटते, ज्याच्याविषयी तुम्ही आग्रही असता, त्याच्या अंतर्विरोधात ते नसते. आपल्यापैकी बहुतेक जण स्वत:शी अगदी अप्रामाणिक असतात. कारण दुसऱ्या लोकांना जे पाहिजे असते त्याच्याबरोबर आपण स्वत:शी लगेच तडजोड करीत असतो. दुसरे लोक काय म्हणतात त्याच्याशी जुळवून घेत असतो. आपण आपल्या भावना, आपल्या स्वत:च्या कल्पना, आपले स्वत:चे हेतू दडपून टाकत असतो. कारण आपल्यापेक्षा मोठा असलेल्या, अधिक लोकप्रिय असलेल्या, अधिक प्रभावी असलेल्या व्यक्तीबरोबर आपण संपर्कात येतो तेव्हा हे घडते. म्हणजे आपण दांभिक बनत असतो. तुम्ही जगभरातल्या राजकारण्यांमध्ये हे सर्व स्पष्टपणे पाहू शकता आणि आपल्या प्रत्येकामध्ये एक राजकारणी दडलेला आहे. तेव्हा पूर्णपणे प्रामाणिक असणे शक्य आहे का? एका आदर्शाला किंवा तत्त्वाला प्रामाणिक असणे नव्हे. कारण तो प्रामाणिकपणा नसतो. जर मी आदर्शाचा सराव करीत असेन तर मी दुटप्पी जीवन जगत असतो. तुमच्यामध्ये तुम्ही हे निरीक्षण करा. कारण जर मी हिंसक आहे आणि म्हणून मी अहिंसक होण्यासाठी प्रयत्न करीत असेन तर आपल्या अंतर्यामी मानसिकदृष्ट्या काय घडत असते? वस्तुस्थिती एक आहे आणि आदर्श दुसराच असतो. प्रत्यक्षात मी हिंसक आहे आणि मी हिंसक न होण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु ते करीत असताना मी हिंसेची बीज पेरीत असतो. कारण वस्तुस्थिती एक आहे आणि माझा आदर्श दुसराच असतो. हे अगदी टोकाचे वाटत असेल, परंतु त्याकडे लक्षपूर्वक पाहा, त्याचे परीक्षण करा, आदर्शवादी हा अप्रामाणिक असतो. जो मनुष्य एखादे तत्त्व अनुसरत असतो तो अप्रामाणिक मनुष्य असतो. जेव्हा एखादा मनुष्य जे स्वत: नसतो त्याचा सराव करतो, तेव्हा तो अप्रामाणिक असतो. परंतु जेव्हा तो जे आहे ते मान्य करतो, तेव्हा तो खरा प्रामाणिक असतो. तेव्हा खरी समस्या अशी आहे की जे आहे त्याच्या पलीकडे कसे जाणे. तुम्हाला समजतंय का? उदाहरण घ्यायचे तर समजा, तुम्ही विषयासक्त आहात आणि त्यातील सर्व गुंत्यासह तुम्ही विषयासक्त न राहण्याचा प्रयत्न करता आहात, कारण तुम्ही तसे वाचलेले असते किंवा तुम्हाला कोणीतरी सांगितलेले असते की तुम्ही जर विषयासक्त असाल तर तुम्ही सत्याच्या जवळ जाणे संभवत नाही, तुम्ही हे किंवा ते होऊ शकत नाही. तुम्ही विषयवासना दडपण्याचा प्रयत्न करता. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की तुम्ही विषयासक्त आहात आणि तुम्ही विषयासक्त न होण्याचा प्रयत्न करता तेव्हा तुम्ही तुमच्याबरोबर अप्रामाणिक राहण्याचा खेळ खेळत असता. मग प्रश्न उभा राहतो की या विषयवासनेच्या पलीकडे कसे जायचे? तो खरा प्रश्न आहे. विषयासक्त कसे होऊ नये हा प्रश्न नव्हे. एखाद्या मनुष्याला जर राग

आलेला असेल आणि तो म्हणतो, 'मला राग येता नये', तर तो स्वत:शी अप्रामाणिकपणाचा खेळ खेळत असतो. परंतु जर तो म्हणेल, 'मला राग आलेला आहे, मी तो मान्य करतो, मी पाहतो की मला राग आलेला आहे. त्याच्यापलीकडे मी कसं जायचं?' – तो एक प्रामाणिक प्रश्न असतो. कसे व्हायचे तो प्रश्न नव्हे, तर ज्या मनाला राग येण्याची क्षमताच नसेल असे मन कसे मिळेल हा प्रश्न. तुम्हाला समजतंय का?

तेव्हा प्रश्न असा आहे की आपण इथे आहोत, मानवजात जी निष्ठूर आहे, उदासीन, असंवेदनाक्षम, अप्रामाणिक आहे, अनेक दु:ख आणि संकटांमध्ये सापडलेली आहे, त्याच्या पलीकडे जाणे आपल्याला कसे शक्य आहे? आणि या भेदाभेद निर्माण करणाऱ्या गोष्टींच्या पलीकडे जाणे शक्य आहे का? तुम्हाला माझा प्रश्न समजतोय का?

राजघाट १९६७, भाषण २

## प्रामाणिकपणा म्हणजे काय?

**प्रा**माणिकपणा म्हणजे काय? जर एखादे तत्त्व, एखादा आदर्श, एखादे उदात्त सूत्र आपण मनाशी बाळगले तर तिथे प्रामाणिकपणा असेल का – म्हणजे अंतरंगाचे स्पष्ट ज्ञान, वास्तव जसे आहे तसे स्पष्ट दिसणे – असू शकेल का? मनात गोंधळ असेल तर आपल्याला प्रामाणिक आणि सरळ (direct) असणे शक्य आहे का? सौंदर्य आणि सचोटी म्हणजे काय याचा एखादा मानदंड अगोदरच ठरलेला असेल तर तिथे सौंदर्य असू शकेल का? 'जे आहे ते' आणि 'जे असावेसे वाटते,' या दोहोत जेव्हा भेद असतो तेव्हा प्रामाणिकपणा असू शकतो का? की तेथे केवळ गौरवप्राप्त आणि लब्ध प्रतिष्ठित अप्रामाणिकपणा असतो? प्रत्यक्षात 'जे आहे' आणि 'जे होऊ शकेल' या दोन्हीच्या बेचक्यात आपण लहानाचे मोठे झालेले असतो. या दोन्हींमधील काल आणि अवकाश यांच्या मध्यंतरात आपले सारे शिक्षण, साऱ्या धडपडी आणि आपली नीतिमत्ता ही सामावलेली असतात. आपले लक्ष एकदा एकीकडे 'जे आहे'त्याकडे आणि एकदा दुसरीकडे 'जे असावे' त्याकडे खेचून जाते, असे विचलीत असते. एका अवस्थेत भीती असते तर दुसरीत आपल्या आशा पल्लवित होत असतात. या अशा गोंधळलेल्या अवस्थेत – जे शिक्षण आहे असे समजले जाते – प्रामाणिकपणा, सच्चेपणा असू शकतो का? आपण अप्रामाणिक आहोत असे जेव्हा म्हणतो तेव्हा वस्तुत: आपण जे म्हणालेले असतो आणि जे प्रत्यक्षात असते त्या दोन्हीमध्ये एक तुलनाच अभिप्रेत असते. आपल्याला जे बोलायचे मनात नसते ते काहीतरी आपण बोलतो, तेव्हा कदाचित दुसऱ्याला दिलासा देण्याची आपली इच्छा असते किंवा आपण जे खरे आहे ते बोलायला शरमतो किंवा धजत नाही. म्हणजे मनाने घेतला धसका आणि भीती या आपल्याला अप्रामाणिक बनवतात. आपण यशाच्या मागे लागलो तर आपल्याला थोडेफार अप्रामाणिक बनावेच लागते, दुसऱ्यांच्या तालावर नाचावे लागते, स्वार्थ साधण्यासाठी धूर्तपणा व कपट करावे लागते, किंवा आपल्या हाती सत्ता व उच्चपद आलेले असते आणि ते टिकवून ठेवायचे असते. म्हणून सगळा प्रतिकार आणि सगळे समर्थन म्हणजे अप्रामाणिकपणाचे एक रूप होय. प्रामाणिक असणे म्हणजे स्वत:विषयीचे भ्रम नसणे, एवढेच नव्हे तर अभिलाषा आणि सुखोपभोग यांच्या रूपात वावरणाऱ्या भ्रमाचे बीजही नसणे होय.

*एकमेव परिवर्तन*, युरोप प्र. १९

## प्रामाणिकपणा हा अप्रामाणिकपणाची उलट बाजू नव्हे

**प्रा**माणिकपणा ही फार गुंतागुंतीच बाब आहे. तुम्ही कशाबद्दल आणि कशासाठी प्रामाणिक आहात? तुम्ही स्वत:शी प्रामाणिक असताना इतरांशी चांगले असू शकता का? जेव्हा कोणी म्हणते की मी प्रामाणिक असायला पाहिजे, तेव्हा ते शक्य आहे का? प्रामाणिकपणा ही आदर्शाची बाब आहे का? आदर्शवादी कधी प्रामाणिक असू शकतो का? तो भूतकाळातून घडवलेल्या भविष्यकाळात जगत असतो. काय असायला हवे आणि काय आहे ह्या द्वंद्वात तो पकडला गेलेला असतो. म्हणून तो कधीही प्रामाणिक असू शकणार नाही. तुम्ही विविध कृतींचा केंद्रबिंदू असता – कधी कधी परस्परविरोधी कृती, नेहमी एकमेकांच्या विरोधात असलेले अनेक प्रकारचे विचार, भावना आणि इच्छा यांचा केंद्रबिंदू. कुठली इच्छा किंवा विचार प्रामाणिक असतात आणि कुठले नाही? हे केवळ तुम्हाला प्रभावित करण्यासाठी विचारलेले प्रश्न किंवा चतुर प्रतिपादन नव्हे. संपूर्णपणे प्रामाणिक असणे म्हणजे काय हे समजणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण आपण अंतर्दृष्टी (परिज्ञान) आणि तत्काळ कृती हे काय आहे ते पाहणार आहोत. अंतर्दृष्टीच्या आशयाचे खोलवर आकलन होणे अत्यंत महत्त्वाचे आहे, संपूर्ण एकात्मतेची गुणवत्ता असणे, ती एकात्मता जी पूर्णत्वाची प्रामाणिकता असते.

एखाद्या माणसाला एखाद्या आदर्शाबद्दल, सिद्धांताबद्दल किंवा खोलवर रुजलेल्या श्रद्धेबद्दल प्रामाणिकपणा जाणवू शकेल – परंतु हा नक्कीच प्राामाणिकपणा नव्हे. जेव्हा द्वंद्वाचा संघर्ष नसेल, विरुद्ध असे काही अस्तित्वात नसेल तेव्हाच केवळ प्रामाणिकपणा असू शकेल. अंधार-प्रकाश, दिवस-रात्र, पुरुष-स्त्री, उंच-बुटका वगैरे फरक असू शकतात. परंतु विचारच त्यांना विरुद्ध बनवितो आणि परस्परांच्या विरोधात उभे करतो. माणसाने बनवलेले मानसिक विरोध आम्ही स्पष्ट करत आहोत. प्रेम हे तिरस्कार, मत्सर यांच्या विरुद्ध नव्हे. जर तसे असेल तर ते प्रेम नव्हे. नम्रता ही दिमाख, गर्व, उद्धटपणा ह्याची उलट बाजू नव्हे. जर तसे असेल तर ती उद्धटपणा, गर्विष्ठपणा ह्यांचाच भाग असेल आणि ती नम्रता असू शकत नाही. नम्रता ही सर्वांपासून संपूर्ण वेगळी आहे. जे मन नम्र असते त्याला स्वत:च्या नम्रतेची जाणीव नसते. म्हणून प्रामाणिकपणा हा अप्रामाणिकपणाची उलट बाजू नव्हे.

एखादा स्वत:च्या विश्वासांबद्दल, कल्पनांबद्दल सच्चा असेल पण हा सच्चेपणा संघर्ष निर्माण करतो; आणि जिथे संघर्ष आहे तिथे प्रामाणिकपणा नसतो. म्हणून आम्ही विचारीत आहोत की, तुम्ही स्वत:शी प्रामाणिक होऊ शकाल का? तुम्ही स्वत: म्हणजे अनेक प्रवाहांची सरमिसळ आहात, ज्यात एकमेकांना ओलांडणे आहे, एकमेकांवर वरचढपणा आहे, आणि क्वचित एकत्र प्रवाहित असणे आहे. जेव्हा हे सर्व प्रवाह एकत्रितपणे ओघवते होतात तेव्हा तिथे प्रामाणिकपणा असतो. शिवाय, सबोध व अबोध वेगळे केले आहेत, देव व दानव वेगळे केले आहेत. विचाराने हे विभाजन व त्या विभाजनात असणारे संघर्ष निर्माण केले आहेत. चांगुलपणाला विरुद्ध नाही.

प्रामाणिकपणाच्या ह्या नवीन आकलनामधून आपण परिज्ञान म्हणजे काय हे पाहायला सुरुवात करुया. हे खूपच महत्त्वाचे आहे कारण आचरणात क्रांती आणि खुद्द मेंदूमध्ये परिवर्तन घडवून आणण्यात याचा भाग असू शकेल.

*The Whole Movement of Life is Learning*, प्र. १६

## आमच्या वाचकांना उद्देशून

**भा**रत, इंग्लंड, अमेरिका आणि स्पेन येथील कृष्णमूर्ती फाउंडेशन्स्‌मधील काही विश्वस्त २०११ साली, मे महिन्यात इंग्लंडमधील ब्रॉकवुड पार्क येथील अध्ययन केंद्रात एकत्र जमले होते. कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीविषयी एकत्र संवाद साधणे आणि प्रत्येक फाउंडेशनतर्फे त्यांच्या शाळा आणि अध्ययन केंद्रांमधून चाललेल्या कार्याबद्दल विचार विनिमय करावा हा यामागील उद्देश होता. कृष्णमूर्तींची अध्ययन केंद्रांबद्दलची भविष्य दृष्टी, तसेच तळमळ असलेल्या गंभीर लोकांनी सवड काढून कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीच्या अनुषंगाने आपल्या जीवनाचा आढावा घेण्याला ते किती महत्त्व देत होते, हे लोकांपर्यंत कसे पोचवायचे हा विषय या संवादांमध्ये चर्चेसाठी पुढे आला.

मृत्यूपूर्वी काही वर्षे, १९८२च्या सुमारास कृष्णमूर्ती म्हणाले, 'आपण लहान मुलांसाठी बरेच काही केले आहे. आपल्या अनेक शाळा आहेत. खास प्रौढांसाठी आपण काही करण्याची वेळ आता आली आहे.' त्यांना वाटत असे की नोकरी, कुटुंब आणि जीवनातील इतर बाबींमुळे शिकवणुकीमध्ये पूर्णपणे मग्न होऊ शकत नाहीत असे अनेकजण आहेत. अशा लोकांसाठी त्यांना अध्ययनस्थळे प्रस्थापित करायची होती, जिथे त्यांची सारी शिकवणूक ही पुस्तके, ध्वनीचित्रफिती (ऑडिओ, व्हिडिओ रेकॉर्डिंग्ज्) यांच्या माध्यमातून उपलब्ध असेल; जिथे लोक वेळोवेळी निवांतपणे शांतताभंग न होता अभ्यास करण्यासाठी जाऊ शकतील – कुठल्याही आयोजित कार्यक्रमांशिवाय आणि जिथे त्यांची स्वत:ची विवेकबुद्धीच त्यांचे मार्गदर्शन करीत असेल. शिकवणुकीचा अभ्यास करण्याचे महत्त्व आणि अशा अध्ययन केंद्राचे स्वरूप व त्यामागील उद्देश याबद्दल त्यांनी काही विधाने प्रसिद्ध केली आणि त्यांच्या जवळच्या सहभाग्यांबरोबर चर्चा केल्या.

अंतरलहरीच्या या अंकामध्ये ती विधाने आणि ते संवाद यामधील उतारे प्रस्तुत करीत आहोत.

## जिथे सारा खजिना आहे...

**अध्ययन केंद्रांबद्दल – जे. कृष्णमूर्ती**

***कृष्णमूर्ती:*** महाशय, बनारसमधील राजघाट येथे आम्ही ही विचारणा करून सुरुवात केली की अशी काही माणसं, त्यांचे गट आहेत का, ज्यांची केवळ शाळेशी किंवा एखादा विशिष्ट विषय शिकवण्याशी बांधिलकी आहे असे नव्हे, तर 'के' जे काही सांगत आहेत – त्या 'शिकवणुकी'शी पूर्णपणे बांधिलकी आहे? 'शिकवणूक' हा शब्द जर मी वापरू शकलो तर, हा अती भव्य दिव्य शब्द वाटेल, पण हा चांगला शब्द असावा. आम्ही विचारत होतो की, शिकवणुकीशी बांधिलकी असलेला असा गट आहे का, व्यक्तीशी बांधिलकी नव्हे, व्यक्तीच्या कल्पनाविलासाशी नव्हे, व्यक्तिबद्दलच्या एखाद्या प्रतिमेशी नव्हे, तर त्या व्यक्तीने जे सांगितले आहे त्याच्याशी बांधिलकी असलेली माणसे, व्यक्ती महत्त्वाची नाही आणि हे केवळ तोंडी विधान नव्हे, मला खरोखरच मनापासून असे वाटते. शिकवणूक महत्त्वाची आहे आणि अशा काही लोकांचा गट आहे का, जे त्यात पूर्णपणे गुंतलेले आहेत, त्यांच्याशी तादात्म्य पावले आहेत आणि त्यामुळे ते त्या शिकवणुकीचे शिक्षक आणि शिष्य दोन्हीही होतील? ते त्यांच्या रक्तात भिनलेले असेल, त्यामुळे ते शिकवणुकीचे केवळ अध्यापन करतील असे नव्हे तर तिचे आकलनही करून घेत असतील, शिक्षक आणि शिष्य दोन्हीही असतील.

आता, हे काही अहंकारातून बोलले गेलेले नाही, शिकवणुकीबद्दल एक प्रकारचा मालकीहक्काचा हव्यास असल्यासारखी आसक्ती नाही. मला वाटते की ही शिकवण मानवाचे संपूर्ण अस्तित्व व्यापते. तुम्ही या शिकवणुकीचा अभ्यास केला आहे की नाही ते मला माहीत नाही. ह्या शिकवणुकीत मानवाच्या पूर्ण जीवनाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. शारीरिक अस्तित्वापासून तो मानवाच्या खोलवरच्या आंतरिक स्तरापर्यंत सारेच. तेव्हा एखादी अंधानुकरणपर तत्त्वप्रणाली किंवा हे ना ते म्हणून वेगळे पाडण्यासारखे यात काही नाही. जेव्हा तुम्ही त्याकडे नीट लक्ष देऊन पाहता तेव्हा म्हणता, 'अरे देवा!' मी व्यक्तिश: त्याकडे एक विस्मयकारक गोष्ट या दृष्टीने पाहतो, मी ते म्हटले आहे म्हणून नव्हे, तर ते काहीतरी असामान्यपणे जीवनदायी आहे म्हणून. आणि हा जीवनदायी झरा कधीही सुकणार नाही. माझ्यासाठी हे सत्य आहे, नाहीतर मी त्यावर एक दिवसही वाया घालविला नसता.

*Don't Make a Problem of Anything*
ऋषी व्हॅली येथील संवाद, १९८२

**ही** तथाकथित शिकवणूक म्हणजे सुव्यवस्थित असे सामान्य शहाणपण आहे, असे 'के' समजतात आणि ती शिकवण अत्यंत अवधानाची, सूक्ष्मतेची आणि पुस्तकाच्या अगदी शेवटापर्यंत (हा शोध) अविरत चालू असण्याच्या जाणीवेची मागणी करते. जगातील वेगवेगळ्या भागात हे काहीशा प्रमाणात दुर्लक्षिले जाते असे दिसून येते. मी 'काहीशा प्रमाणात' हे शब्द सभ्यतेने वापरीत आहे; मला यापेक्षा बरीच प्रखर भाषा वापरावीशी वाटते. हे घडत आहे. आपण दरवर्षी भेटतो, आपण हे जवळजवळ २५ वर्षे सानेन (स्वित्झर्लंड) मध्ये केले आहे, आणि आपण एकत्र येऊ शकत नाही असे दिसते, सर्वांसाठीच असलेल्या जीवनातील साध्यासुध्या बाबी आणि 'के'च्या शिकवणुकीशी असलेले त्याचे सारे सूचित संबंध समजू शकत नाही असे दिसते. आपण पुस्तकाच्या शेवटापर्यंत कधी पोहोचू शकणार नाही असे दिसते.

सानेन येथील संवाद, १३ जुलै १९८४

**चे**न्नईमधील वसंत विहारने लोकांना आकर्षित केले पाहिजे – ज्यांचा मेंदू तल्लख आहे आणि ज्यांची प्रज्ञा तरल आहे अशा लोकांना. तुम्हाला जर वैद्यकशास्त्र बौद्धधर्म किंवा इतर कुठल्याही विषयाचा अभ्यास करायचा असेल तर जसा एकात्मतेने कराल, तसाच त्यांनी या शिकवणुकीचा अगदी बारकाईने, पूर्णपणे अभ्यास केला पाहिजे, या शिकवणुकीशी अगदी खोलवर तादात्म्य पावले पाहिजे. शिकवणुकीचा अभ्यास करणे म्हणजे त्यात वापरलेल्या शब्दांमधील सूक्ष्मभेदाचा आणि त्यात सामावलेल्या बाबींचा खोलवर ठाव घेणे आणि दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेले त्यातील सत्य पाहणे. विद्वान अभ्यासकाप्रमाणे त्यांना कुठल्याही शाखेमधील तज्ज्ञांबरोबर चर्चा करता आली पाहिजे.

आणि हा अभ्यास करीत असताना ह्या लोकांमध्ये सहकाराची वृत्ती असली पाहिजे. सहकारवृत्ती म्हणजे एखाद्या कार्यासाठी एकत्र काम करणे नव्हे, तर मी कार्यरत असताना, मी माती खणत असताना, मी कशाचा तरी विचार करीत असेन आणि मी तुमचा मित्र असल्यामुळे – आणि तुम्ही सुद्धा काहीतरी काम करीत असता – मी लगबगीने

तुमच्याकडे येतो आणि मला जे गवसलेले असते त्याबद्दल चर्चा करतो. तुम्ही कदाचित त्याबद्दल शंका घ्याल, त्याबद्दल प्रश्न उभा कराल, पण मी तुम्हाला या शोधात सहभागी करून घेत आहे. हा काही माझा शोध नव्हे, तो माझ्या किंवा इतर कोणाच्याही मालकीचा नाही. अंतर्दृष्टी ही कधीही वैयक्तिक नसते. असे एकमेकांमध्ये वाटून घेणे हेच सहकार्य.

परंतु ते प्रकटपणे कबुली देणे नसावे. अमेरिकेत असे समूह आहेत जे एकमेकांकडे जाहीर कबुली देतात – हे परक्यांसमोर आपल्या वैयक्तिक भानगडी खुशाल चर्चिण्यासारखे आहे.

आणखी एक म्हणजे, मी जर खोटारडा असेन, तर तुमची आणि माझ्या सर्व मित्रांची जबाबदारी आहे. कारण आपल्या सर्वांना या शिकवणुकीमध्ये रस आहे, तिचा गहन अभ्यास करण्यामध्ये आणि दैनंदिन जीवनात ते जगण्यामध्ये, आपण जे काही आहोत त्याबद्दल एकमेकांना जबाबदार आहोत. आपल्या दैनंदिन जीवनातील सत्याचा शोध घेण्यात रस असलेल्या मित्रांमधील अशी ही एकोप्याची भावना आणि एकमेकांबद्दल जबाबदारीची जाणीव असल्याची भावना ही सहकार्याची वृत्ती आहे आणि वसंत विहारमध्ये राहणाऱ्या प्रत्येकामध्ये ही सहकार्याची भावना असेल तर ते असे वातावरण निर्माण करतील, घडवून आणतील जिथे नव्याने आलेला मनुष्यही बहरू शकेल.

ऋषी व्हॅलीला जात असताना प्रवासात
एका विश्वस्ताबरोबरील संवाद, १९ नोव्हेंबर १९८३

**हे** (वसंत विहार) हजारो वर्षे टिकले पाहिजे, प्रदुषित न होता, एखाद्या नदीप्रमाणे, जिच्यात स्वत:ला विशुद्ध करण्याची क्षमता असते. याचा अर्थ तेथे राहणाऱ्यांना कुठल्याही प्रकारचा अधिकार नाही आणि स्वत: त्या शिकवणुकीमध्येच सत्याचा अधिकार आहे.

हे चांगुलपणा बहरण्यासाठीचे स्थान आहे. कार्य, आदर्श किंवा वैयक्तिक अधिकारावर आधारभूत नसलेले सहकार्य आणि परस्परसंवाद. एखादा विषय किंवा तत्त्व, विश्वास, श्रद्धा इ. साठींचे सहकार्य इथे सूचित नाही. एखादा जसा या ठिकाणी येतो, प्रत्येकजण आपापल्या कामात गुंतलेला – बागेत काम करीत असतो किंवा इतर काही करीत असतो – काम करीत असतानाच त्याला काही शोध लागू शकतो, आणि तो त्याबद्दल इतरांना सांगून त्यांच्याशी संवाद साधतो – त्याला ज्या सत्याचा शोध लागला आहे त्यामध्ये किती तथ्य आहे ते पडताळून पाहण्यासाठी शंका उपस्थित करील, प्रश्न विचारील. म्हणजे तेथे सततचा परस्परसंवाद असतो आणि ते कोणीही एकाकीपणे साध्य केलेले असे काही नसते, एकट्याचेच प्रबोधन, एकट्यालाच झालेले आकलन नसते. एखाद्याला जर काही मूलभूत, नवीन असे गवसले तर ते वैयक्तिक नसेल, तर तिथे असलेल्या सर्वांसाठीच असेल अशा जाणीवेने हे घडवून आणणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे.

हा काही सामाजिक गट नव्हे; सामाजिक किंवा समान गोष्टींमध्ये ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत अशा लोकांचा विभाग ही परिभाषाच आक्रमक आणि संपूर्ण मानवतेपासून विलग करणारी गती आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की सारी मानवता या ठिकाणी येते. हे मुख्यत: 'के'नी धर्माबद्दल जे सांगितले आहे त्यानुसार असलेले धार्मिक केंद्र आहे. ही अशी जागा आहे जिथे व्यक्ती फक्त शारीरिक स्तरावरच सातत्याने, निरंतर सक्रिय असते असे नाही, तर तिथे ज्ञानाची स्पंदनशीलताही असते. आणि म्हणून प्रत्येक जण शिक्षक आणि शिष्य बनतो. ही जागा एखाद्याला स्वत:ला दिव्य दृष्टी मिळविण्यासाठी किंवा कलात्मकदृष्ट्या, धार्मिकदृष्ट्या किंवा इतर काही रितीने स्वत:च्या ध्येय्यपूर्तीसाठी नाही. खरे तर, ती एकमेकांना आधार देऊन चांगुलपणामध्ये बहरण्यासाठी, एकमेकांचे पोषण करण्यासाठी आहे.

कर्मठता किंवा पारंपारिक विचारसरणी यापासून ही जागा पूर्णपणे मुक्त असली पाहिजे. खरं तर इथे संपूर्ण स्वातंत्र्य असेल. राष्ट्रीयता, वर्णद्वेश, धार्मिक समज आणि श्रद्धा यांच्याशी निगडित अशा सर्व कल्पनांपासून मुक्ती अनुभवता येईल. जर कोणी हे प्रामाणिकपणे आणि समग्रतेने करण्यास असमर्थ असेल तर त्याने या जागेपासून लांबच राहिलेले बरे. ज्ञान हा माणसाचा शत्रू आहे हे पाहण्याची अंतर्दृष्टी मूलत: मानवाला असते.

कल्पनाविश्वात रमणाऱ्या किंवा भावनाप्रधान लोकांसाठी ही जागा नाही. ह्यासाठी तल्लख मेंदूची आवश्यकता आहे, त्याचा अर्थ बुद्धीनिष्ठ असणे असे नव्हे, तर असा मेंदू जो वस्तुनिष्ठ आहे, मूलत: स्वत:शी प्रामाणिक आहे आणि ज्याच्या बोलण्यात आणि कृतीत समग्रता आहे.

संवाद हा अतिशय महत्त्वाचा आहे. तो परस्पर संवादाचा असा प्रकार आहे ज्यात, जोपर्यंत प्रश्नाचे उत्तरच उरत नाही तोपर्यंत प्रश्नोत्तरे चालू राहतात. अशा प्रकारे त्या प्रश्नोत्तरात सहभागी असलेल्या दोन व्यक्तींमध्ये तो प्रश्न लोंबकळत राहतो. ते एखादा न उमललेल्या अस्पर्श कळीप्रमाणे असते. त्या प्रश्नाला जर विचाराचा स्पर्शही झाला नाही, तर त्याच्याजवळ त्याचे स्वत:चेच उत्तर असते कारण व्यक्ती ह्या नात्याने, प्रश्नकर्ता आणि उत्तर देणारा, हे लोप पावलेले असतात. हे संवादाचे असे स्वरूप असते, ज्यात उत्कटतेच्या आणि गहनतेच्या अशा टप्प्याला चौकशी पोहोचते, की मग त्या संवादाची जी गुणवत्ता असते ती विचार कधीही गाठू शकत नाही. ही काही मतांची, कल्पनांची विवादात्मक चौकशी नव्हे, तर हे दोन किंवा अधिक गंभीर आणि चांगल्या प्रतीच्या मेंदूंचे शोध घेणे असते.

वृक्षराई, पक्षी असलेले, शांततामय असे हे अतिशय सुंदर ठिकाण असले पाहिजे, कारण सुंदरता हे सत्य असते आणि सत्य म्हणजे चांगुलपणा आणि प्रेम. बाह्य सौंदर्य, बाह्य स्थिरचित्तता, शांतता यांचा आंतरिक स्थिरचित्ततेवर परिणाम होईल. परंतु आंतरिक सुंदरतेवर बाहेरील परिसराचा, वातावरणाचा कुठल्याही प्रकारे प्रभाव पडू नये. जेव्हा 'स्व' नसेल तेव्हाच केवळ सुंदरता असू शकते. त्यात परिसर, जो अतिशय विलक्षण असला पाहिजे, त्यात कुठल्याही प्रकारे मनाला गुंतवणाऱ्या गोष्टी नसाव्यात, एखाद्या मुलाचे मन खेळण्याने जसे रमून जाते त्याप्रमाणे रमवून टाकणारा नसावा. इथे कुठलीही खेळणी नसतात, तर आंतरिक खोली, सघनता आणि एकात्मता असते. पण हा विचाराचा परिपाक नसतो.

शिवाय, ज्ञान म्हणजे सुंदरता नव्हे. सौंदर्य म्हणजे प्रेम आणि जिथे ज्ञान असते तिथे सौंदर्य नसते.

प्रश्नाची खोलीच त्याचे स्वत:चे उत्तर आणते. ही सारी काही बौद्धिक करमणूक नव्हे, सिद्धांतांचा पाठलाग नव्हे. शब्द हीच कृती असते. ते दोन्ही कधीही विलग असू नयेत. जिथे शब्द ही कृती असते तिथे एकात्मता असते. केवळ जिथे प्रेम आणि करुणा असेल तिथेच प्रज्ञा असू शकते. जिथे मेंदू पूर्वसंस्कारित असतो किंवा त्याला भक्कम आधार असतो तिथे करुणा असूच शकत नाही.

सामान्य दर्जाच्या संग्रहाने धार्मिक केंद्र घडत नसते. धार्मिक केंद्र हे आपण करीत असलेल्या प्रत्येक गोष्टीमध्ये सर्वोत्तम गुणवत्तेची आणि मेंदूच्या अत्युच्च कर्तबगारीची मागणी करते. सामान्य दर्जाचा पूर्ण अर्थ आहे मंद, जड मेंदू ज्याला ज्ञानामुळे गुंगी आली आहे.

चांगुलपणामध्ये बहरणे हे एखाद्या आदर्शाचा किंवा भविष्यातील ध्येयाचा पिच्छा पुरवणे नसते. आपण कल्पनारंजित असे काही प्रस्थापित करीत नाही आहोत तर कठोर वास्तवाबरोबरचा हा व्यापार आहे. तुम्ही या सगळ्यामधून भविष्यात काहीतरी मिळवायचे असे म्हणू शकता. भविष्य हे वर्तमानकाळ आहे. वर्तमान हे भूत आणि भविष्य दोन्हीही आहे, विचार आणि काळाची संपूर्ण घडण. परंतु जर कोणी, केव्हा तरी नव्हे तर दररोज, मृत्युबरोबर जगत असेल, तर तिथे बदल नसतो, बदल म्हणजे झगडा आणि काळजीची वेदना. ज्ञानाचा संग्रह, साठेबाजी नसल्यामुळे तिथे बदल नसतो, कारण मग आपण मृत्यूबरोबर सतत जगत असतो. आपण पायाचा पहिला दगड लावतो तो धार्मिक असला पाहिजे.

वसंत विहार येथे एका विश्वस्तास सांगून लिहून घेतलेले–
२६/२७ जानेवारी १९८४

**म**ला असं दिसतं की अभ्यास केंद्र ही आवश्यकता झाली आहे कारण ती अशी जागा आहे जिथे तो खजिना आहे, बरोबर? तो खजिना. त्या खजिन्यातून तुम्हाला बरंच काही मिळू शकतं. तुम्हाला तुमची ताकद, तुमची ऊर्जा मिळू शकते, तुमचं भरण पोषण होऊ शकतं – बऱ्याच गोष्टी तुम्ही मिळवू शकता. शाळांना त्यांच्या मर्यादा आहेत, बरोबर? इथे – कसं सांगावं ते मला कळत नाही – हे पवित्र असं काही आहे, असं आतापुरतं म्हणुया. आणि या पावित्र्यातूनच सारं काही प्रवाहित होत असतं.

ऋषी व्हॅली अभ्यासकेंद्रांमधील संवाद,
१९ डिसेंबर १९८५

**आ**ता, (इंग्लंडमधील) ब्रॉकवुड हे शाळेशिवाय इतर बरेच काही असले पाहिजे. शिकवणुकीमध्ये ज्यांना खूप खोलवर रस आहे अशा लोकांसाठी हे केंद्र असले पाहिजे अशी जागा जिथे ते राहू शकतील आणि अभ्यास करू शकतील. अगदी पुरातन काळी आश्रम – म्हणजे शांत, एकाकी चिंतनस्थळ – ही अशी जागा असे जिथे लोक आपली ऊर्जा एकवटण्यासाठी येत, जीवनाच्या सखोल धार्मिक अंगांबद्दल चिंतन करण्यासाठी आणि त्यांचा शोध घेण्यासाठी येत. अशा प्रकारच्या आधुनिक स्थानांमध्ये सामान्यत: एखाद्या प्रकारचा नेता, गुरू, महाधिपती किंवा कुटुंबप्रमुख, आदरणीय वृद्ध गृहस्थ असतो, जो मार्गदर्शन करतो, अर्थाचे स्पष्टीकरण करतो आणि वर्चस्व गाजवतो. ब्रॉकवुडमध्ये असा कोणीही नेता किंवा गुरू असता नये, कारण ती शिकवणूक स्वत:च त्या सत्याला व्यक्त करीत असते, ते सत्य ज्याचा गंभीर लोकांनी स्वत:च शोध घेतला पाहिजे... हे केवळ ब्रॉकवुडलाच नव्हे तर इतर साऱ्या कृष्णमूर्ती फाउंडेशन्स्ना लागू आहे.

ब्रॉकवुड पार्क येथील संवाद, १९८३

**‘के’** जेव्हा उद्यापासून इथे नसेल तेव्हा तुम्ही या केंद्राचे काय कराल? आपल्या साऱ्यांचे एकमत झाले आहे की, संवादासाठी एक जागा असावी, एकत्र भेटण्यासाठी जागा आणि अशी जागा जिथे लोक येऊन शांत राहू शकतील, चर्चा करू शकतील, विश्रांती घेऊ शकतील, जगाच्या गोंगाटामध्ये गुंतलेले नसतील. तुम्ही या साऱ्याची तजवीज कराल का? भारतात, ब्रॉकवुडमध्ये इथे (ओहाय) आणि कॅनडामध्ये.

मी सीॲटलहून येतो. तुम्ही इथे केंद्रामध्ये आहात, तुमचा एक गट. मी बऱ्यापैकी बुद्धीमान आहे. तुम्ही माझ्याबरोबर चर्चा करणे मला हवे आहे, भीतीबद्दलचा सखोल संवाद, औषधोपचार म्हणून नव्हे – मला भीतीचा अंत करायचा आहे. मला त्याचे महत्त्व जाणवते. इथे येऊन, तुमच्याशी चर्चा करून भीतीचा अंत होईल अशी मला आशा आहे.

*CW:* या व्यक्तीला भीतीबद्दल काही वाचण्यासाठी देणे शक्य आहे का?
*के:* हो, मी वाचतो, मी वाचले आहे. मी ध्वनीमुद्रित ऐकले आहे.
*CW:* आणि मग एकत्र चर्चा करायची?
*के:* हो, मला तेच पाहिजे... भीतीपासून मुक्त होण्याचा माझा उद्देश आहे. तुम्ही हे कसे हाताळता? तुम्ही असे म्हणाल का, ‘क्षमा करा, मी तुम्हाला भीतीचा अंत करण्यास मदत करू शकत नाही, पण आपण यावर संवाद साधू शकतो; मी माझ्यामधील भीतीचा अंत करू शकलो नाही, तेव्हा आपण दोघेही ह्याचा एकत्र शोध घेऊया का, भीतीचा अंत करण्याची निकड जाणून घेऊया, म्हणजे आपण एकमेकांना भीतीचा अंत करण्यासाठी मदत करू?’ तुम्ही असे म्हणाल का? म्हणजे तिथे अधिकाराची भावना नाही. मी माझ्या भीतीचा अंत केला नाही, तुम्हीही भीतीचा अंत केलेला नाही. दररोज किंवा एक दिवसाआड एकत्र येऊन, शांतपणे बसून, चर्चा करून, अत्यंत खोलवर संवाद साधून, आपण भीती विरून जाण्यासाठी एकमेकांना मदत करू. तुम्ही जर हे केलेत, तर मी सीॲटल् किंवा जमाइकाहून इथे येईन.

*Perfume of the Teachings*
विश्वस्तांबरोबरील संवाद, १९७७

***प्रश्न:*** तुम्ही गेले १६ महिने एकाकी शांत स्थळी राहिले आहात आणि हे तुमच्या आयुष्यात असे पहिल्यांदाच घडले असावे. याला काही विशेष अर्थ आहे का हे आम्ही जाणून घेऊ शकतो का?

***कृष्णमूर्ती:*** तुम्हालाही कधी शांत स्थळी जाऊन साऱ्या गोष्टींचा आढावा घ्यावे असे वाटत नाही का? नुसते पुन्हा पुन्हा तेच तेच करणारे यंत्र न बनता, वक्ता, स्पष्टीकरण करणारा, विवरण करणारा न बनता? तुम्हाला असे केव्हातरी करावेसे वाटत नाही का, शांत राहावे, स्वत:बद्दल अधिक जाणून घ्यावे असे वाटत नाही का? तुमच्यापैकी काही जण असे करू इच्छितात, परंतु आर्थिकदृष्ट्या तुम्ही तसे करू शकत नाही. तुमच्यापैकी काही जणांना ते करायचे असते. परंतु कौटुंबिक जबाबदारी आणि इतर गोष्टी तुमच्या मार्गावर गर्दी करतात. काही असले तरी, शांत स्थळी जाऊन आपण केलेल्या साऱ्या गोष्टींचा आढावा घेणे चांगले. जेव्हा तुम्ही हे करता, तेव्हा तुम्हाला अशा अनुभवांची प्रचीती येते ज्यांची ओळख पटत नाही, ज्यांचा अर्थ लागलेला नसतो.

केव्हातरी शांत स्थळी जाणे, तुम्ही करीत असलेले सारे काही थांबवून, साऱ्या समजुती, विश्वास आणि अनुभव पूर्णपणे थांबवून, त्यांच्याकडे नव्याने पाहणे, तुम्ही विश्वास ठेवता किंवा ठेवत नाही याची यांत्रिकपणे पुनरावृत्ती करीत न राहता पाहणे, हे अतिशय आवश्यक आहे असे मला वाटते. मग तुम्ही तुमच्या मनामध्ये ताजीतवानी झुळूक येऊ द्याल, असेच कराल की नाही? याचा अर्थ तुम्ही असुरक्षित असले पाहिजे, नाही का? तुम्ही जर असे करू शकाल तर तुमचे मन निसर्गातील गूढ गोष्टींसाठी खुले होईल, आपल्याशी गुजगोष्टी करणाऱ्या गोष्टींसाठी खुले होईल, अशा गोष्टी ज्या तुम्ही अन्यथा गाठू शकणार नाही; देव जो येण्यासाठी थांबला आहे, त्याप्रत पोहोचू शकाल, ते सत्य ज्याला आमंत्रण देता येत नाही तर ते आपणहूनच येते. परंतु आपले मन प्रेम आणि इतर ज्या तरल प्रक्रिया आपल्या अंतरंगात घडत असतात त्यांच्यासाठी खुले नसते, कारण आपण आपल्या स्वत:च्याच महत्त्वकांक्षांमध्ये गुरफटून गेलेले असतो, आपल्या स्वत:च्याच महत्कृत्यांनी, आपल्या स्वत:च्याच इच्छांनी वेढून गेलेले असतो. या साऱ्यापासून दूर शांत एकांतात जाणे हे चांगलेच आहे, नाही का?

मद्रास येथील भाषण, ५ जानेवारी १९५२

## ... तेव्हा संस्था, पद्धती अतिशय महत्वाच्या ठरतात

**ह्या** जगात एकटे उभे राहाणे ही अत्यंत कठीण गोष्ट आहे, समजलं? कदाचित पासपोर्ट धारण करण्यापलिकडे कुठल्याही देशाचे नसणे, कुठल्याही ध्येयवादाचे नसणे, कुठल्याही प्रकारच्या डाव्या किंवा उजव्या चळवळीला वाहून न घेणे, तुम्हाला माहीत नसलेल्या कुठल्याही शब्दाचा पुनरुच्चार न करणे – तेव्हा तेथे एकात्मता असते; कारण जेव्हा तुम्ही एखाद्या संस्थेचे, मंडळाचे असता, एखाद्या गुरूचे किंवा कोणाचेही अनुयायी असता तेव्हा तुम्ही प्रामाणिक नसता. म्हणजे ह्या दुरावस्थेत असलेल्या दुभंगलेल्या जगात – जे शत्रुत्व, कडवटपणा आणि असत्याने भरलेले आहे – त्या जगात एकटे उभे राहणे, तुम्ही असे राहू शकाल का? माफ करा. तुम्ही एक तर करा किंवा करू नका. तुम्ही असे नाही म्हणू शकणार की, 'ठीक आहे, मी ह्या लहानग्या विशिष्ट समुहाचा भाग आहे, पण एरवी मी खरोखरच त्या साऱ्यापासून स्वतंत्र आहे'. जेव्हा एकात्मता नसते, प्रामाणिकपणा, सदाचार नसतात तेव्हा संस्था, पद्धती अतिशय महत्त्वाच्या ठरतात! हे तुमच्या लक्षात आले नाही का? मग संस्था, नियम आपल्या मनाचा ताबा घेतात; परंतु मन जर खरोखर प्रामाणिक, स्पष्ट, सरळ असेल तर नियमांची, पद्धतींची जरूरी नसते, ते पूर्णपणे सदाचारीच असते. तुम्हाला हे सर्व समजते की नाही ह्याचा मला विचार पडतो.

*Facing a World in Crisis,* सानेन १९७२, भाषण १

## त्यातून न नमणारी महान प्रामाणिकता जन्माला येते

**स**र्वप्रथम पाहुया की प्रामाणिक असणे म्हणजे काय, खरोखर खोलवर प्रामाणिक असणे? आपण कुणाशी तरी प्रामाणिक असतो, म्हणजे कशाशी तरी जुळवून घेतो, – काही श्रद्धांशी, अंधश्रद्धांशी किंवा ध्येयवादाशी ज्याला आपण प्रामाणिकपणा म्हणतो. परंतु असे दिसते की जिथे संपूर्ण एकात्मता, अखंडता असते तेव्हा तो प्रामाणिकपणा असतो. ती अखंडता म्हणजे सामान्यपणा नव्हे. शब्दकोशाप्रमाणे सामान्य दर्जाचा असणे म्हणजे टेकडी अर्धी चढणे व शिखरापर्यंत कधीच न पोचणे. कदाचित विज्ञानात आपण शिखर गाठू, तांत्रिक विश्वात आपण टोकाला पोहोचू परंतु आपल्या स्वत:च्या शोध घेण्याचा कळस आपण कधीच गाठत नाही, आपल्या स्वत:च्या आकलनाच्या विश्वात आपण शेवटाला पोचत नाही. आणि आपल्या जीवनातील सौंदर्य आणि गहनता शोधत नाही. जेथे अखंडता असते म्हणजे – पूर्णतेची भावना नव्हे – तर सारे काही एकवटलेलेच असल्याची, विभक्त नसल्याची भावना, अखंडतेची भावना. त्यातून न नमणारी महान प्रामाणिकता जन्माला येते, जिच्यापासून परावृत्त करता येत नाही आणि जिच्याप्रत मन वळवता येत नाही, तर दैनंदिन जीवन अखंडतेने जगता येते.

ब्रॉकवुड पार्क १९८४, भाषण ४

## उत्तरकाशी येथील रिट्रीट

**कृ**ष्णमूर्ती रिट्रीट सेंटर, उत्तरकाशी येथे तीन आठवड्यांचा अध्ययन अवकाश (रिट्रीट) २५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर २०१३ या दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. ह्या रिट्रीटमध्ये कृष्णमूर्तींचे डेव्हिड बोह्म बरोबर जे संवाद झाले, त्यांच्या अनुषंगाने शिकवणुकीचा अभ्यास केला जाईल. संवाद आणि अभ्यासामधून कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीचे आकलन अधिक सखोलपणे व्हावे, हा या रिट्रीटमागील उद्देश आहे. शिकवणुकीची ओळख करून देणारा, केवळ परिचयात्मक असा हा कार्यक्रम नाही. ज्यांना कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीमध्ये अत्यंत गंभीरपणे रस आहे आणि निरीक्षण व अध्ययनातून आत्मशोध घेण्याची तळमळ आहे, अशा अभ्यासकांसाठी हा रिट्रीट योग्य आहे. अभ्यासकांची रिट्रीटमध्ये संपूर्ण तीन आठवडे राहण्याची तयारी असली पाहिजे. अधिक माहितीसाठी संपर्क : krc.himalay@gmail.com
http://jkrishnamurtionline.org/uttarkashi_retreat.php

**आनंद विहार, जांभिळघर येथे व्यवस्थापक पाहिजे**

बदलापूर जवळ कार्यरत असलेल्या जे. कृष्णमूर्ती अध्ययन केंद्रासाठी तेथेच राहणारा व्यवस्थापक पाहिजे. आध्यात्मिक पार्श्वभूमी असलेल्या व शेतीकाम-बागकामाची आवड असलेल्या निवृत्त व्यक्ती/जोडप्यास प्राधान्य. वय, शिक्षण, अनुभव, अपेक्षा यासह त्वरित लिहा. श्री अभिजीत पडते, २०१, उषस्, लिंकींग रोड एक्स्टेन्शन, शास्त्रीनगर, सांताक्रुज (प.), मुंबई ४०० ००४. इमेल: abhijit.padte@gmail.com

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,** वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८.• ईमेल: thestudykfi@yahoo.com • वेबसाईट: www.kfionline.org
कृष्णमूर्तींच्या भाषणांच्या आणि संवादांच्या अनेक डिव्हिडीज् आता आपण ऑर्डर पाठवून मागवू शकता. ही यादी वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बेंगलुरू** संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कँपस,१७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बेंगलुरू-५६००६२.
दूरध्वनी: ०८० - २८४३५२४३ • ईमेल: kfistudy@gmail.com • वेबसाईट: www.kfistudy.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, राजघाट- वाराणसी :** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, राजघाट फोर्ट, वाराणसी २२१ ००१.
दूरध्वनी: ०५४२ - २४४१२८९ / २४४०४५३ • ईमेल: kcentrevns@gmail.com • वेबसाईट: www.j-krishnamurti.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री** पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल : kfisahyadri.study@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र,ऋषी व्हॅली,** जिल्हा चित्तूर, आंध्र प्रदेश - ५१७३५२
दूरध्वनी : (०८५७१) २८०३७/६८६२२/६८५८२ • ईमेल: study@rishivalley.org • वेबसाईट : http://www.rishivalley.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, उत्तरकाशी,** पोस्ट रानारी, डुंडा ब्लॉक, जिल्हा उत्तरकाशी - २४९१५१. • ईमेल: krc.himalay@gmail.com
दूरध्वनी : ९४१२४ ३६४२९/९४१५९८३६९०• वेबसाईट : http://www.jkrishnamurtionline.org भारतीय भाषांमधील संकेतस्थळ

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कोलकाता,** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, ३०, देवदार स्ट्रीट, कोलकाता - ७०००१९.
दूरध्वनी : (०३३) ४००८२३९८ • ईमेल: kfikolkata@gmail.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कटक - ओरिसा,** पुरीघाट रोड, तेलेंगा बझार, कटक - ७५३००९, ओरिसा.
दूरध्वनी : (०६७१) ६४१७९९० • ईमेल: kficuttackcentre@sify.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर :** आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३, महाराष्ट्र. • दूरध्वनी: (०२२) २५०१४०९४, २४२२३१९९ • ई मेल: zilog@vsnl.com

## एकात्मतेमध्ये प्रामाणिकपणा सूचित असतो

'**चां**गला' ह्या शब्दाचा अर्थ मानसिकरित्या बेतशीर बसणे, घर्षणाशिवाय – जसा चांगला दरवाजा करकरीशिवाय बसतो, समजतंय? जशी चांगली गाडी चालते. आणि चांगले म्हणजे अखंड असाही अर्थ आहे. जे तुटलेले, विभाजित नाही. मग आपल्या शिक्षणातून एक चांगला माणूस घडवून आणण्याची आपली तयारी आहे का – जो घाबरलेला नाही, ज्याला शेजाऱ्यांची भीती नाही, भविष्याची काळजी नाही, आजार, गरिबीसारख्या अनेक गोष्टींची भीती नाही, असा माणूस? लहान मुलामध्ये आणि स्वत:मध्ये सुद्धा एकात्मता आणण्यास मदत करायला तो तयार आहे का? एकात्मता ह्या शब्दाचा अर्थ अखंडता असणे असा आहे आणि जे तुम्हाला म्हणायचे तेच बोलणे, एक बोलणे आणि दुसरेच काही करणे असे नव्हे. एकात्मतेमध्ये प्रामाणिकपणा सूचित असतो.आपल्याला जर भ्रम, रोमांचक आणि तर्कावर आधारित असलेले आदर्श आणि जबर श्रद्धा असतील तर आपण प्रामाणिक असू शकू का? आपण एखाद्या श्रद्धेशी प्रामाणिक असू पण त्याचा अर्थ आपण प्रामाणिक आहोत असा होत नाही.

असे तर आपण मुलांना जन्म देऊन ह्या जगात आणतो, दोन-तीन वर्षे होईपर्यंत त्यांना लाडाने बिघडवतो आणि मग त्यांना युद्धासाठी तयार करतो. इतिहासाने मानवाला नाही शिकवले; आपले मुलगे युद्धात मारले गेले म्हणून किती आयांनी अश्रू ढाळले असतील, तरीही हे एकमेकांना ठार मारण्याचे राक्षसी कृत्य थांबवण्यास आपण असमर्थ ठरलो.

आपल्याला जर लहान मुलांना शिकवायचे असेल तर आपल्या स्वत:मध्ये चांगुलपणाच्या निकडीची भावना हवी. चांगुलपणा हे ध्येय नव्हे. ते म्हणजे संपूर्ण असणे, अखंड असणे, भीती नसणे, गोंधळ नसणे. ही ध्येय्ये नव्हेत, त्या कृती आहेत. आपण वास्तव जाणू शकतो का? आणि त्यामुळे शिक्षणातून चांगला माणूस घडवू शकतो का? आपल्याला खरोखर वेगळी संस्कृती, वेगळा माणूस – ज्याचे मन गोंधळलेले नाही, ज्याला भीती नाही आणि ज्याच्यामध्ये एकात्मतेची वेगळी गुणवत्ता आहे, हे सर्व हवे आहे का?

ओहाय, कॅलिफोर्निया, १९८०,
प्रश्नोत्तर सभा १

## ध्यान म्हणजे मनाला सर्व अप्रामाणिकपणापासून मुक्त करणे असते

**वि**चारच अप्रामाणिकपणा निर्माण करतो. प्रामाणिक बनण्याच्या प्रयत्नात विचार हा तुलनात्मक बनतो आणि म्हणूनच तो अप्रामाणिक ठरतो. कोणत्याही प्रकारची तुलना करणे ही टाळाटाळ करण्याची प्रक्रिया असते आणि त्यामुळेच अप्रामाणिकपणा उत्पन्न होतो. अप्रामाणिकपणा हे प्रामाणिकपणाचे विरुद्ध (the opposite) नव्हे, प्रामाणिकपणा हे एखादे तत्त्व नव्हे किंवा एखाद्या चौकटीशी जुळवून घेणेही नव्हे, किंबहुना जे आहे त्याचे संपूर्ण समग्र दर्शन होय. मौनातील या प्रामाणिकपणाचा प्रवाह म्हणजे ध्यान होय.

*एकमेव परिवर्तन,* युरोप, प्र. ९

जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:**
कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड,
चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : (०४४) २४९३ ७८०३/७५९६,
ई-मेल : kfihq@md2.vsnl.net.in
वेबसाईट : www.kfionline.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र** हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत.

**संपर्क** :- कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
मुंबई एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल, मुंबई-४००००६.
दूरध्वनी - २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस्:
www.jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.rishivalley.org
www.j-krishnamurti.org
www.kfistudy.org
www.kscskfi.com
www.jkrishnamurtionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*

*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com
Websites : www.kfionline.org, www.jkrishnamurti.org

*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006.*
*Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : ipw@vsnl.net • Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs, Rite-Print-Pak, Mumbai- 400 013. E-mail : info@Eurythmicdesigns.com*